# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र.झोपुप्रा/उजि.१-ठाणे/३क/८/२०१९
दिनांक :-१७/०१/२०१९

## अधिसूचना

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ब च्या पोटकलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करुन दिनांक १७ मार्च २०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केली आहे,

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (क) उप-कलम (१) अनुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत,

त्याअर्थी, उक्त कलम ३ (क) चे उपकलम (१) मधील शक्तीचा वापर करुन मी, खालील प्रमाणे अनुसूची-१ मध्ये दर्शविलेले क्षेत्र "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र ठाणे महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली १९९४ अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन योजना" दाखल करण्यास पात्र आहे.

## अनुसूची-१

| मौजे-नौपाडा, तालुका-जिल्हा-ठाणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र चौ.मी. | घोषित करावयाचे क्षेत्र चौ.मी. | चतु:सिमा | | | |
| | | | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| १ | ९८३ | १४६४०५.४ | ३३०८६.७९ | पुर्व द्रुतगती मार्ग व न.भू.क्र. ९८३ (पै) | न.भू.क्र. २०२४, ९८३ (पै) व नाला | न.भू.क्र. ९८३ (पै.) व मौजे-मुलुंड, न.भू.क्र. ४६ | न.भू.क्र. ९८४ (पै.) मध्य रेल्वे |
| २ | ९८४ | १०५२२.० | ७१९२.९६ | | | | |
| ३ | ९८५ | ५७७.० | ५७७.० | | | | |
| ४ | १०२२ | १५.०० | १५.०० | | | | |
| | एकूण क्षेत्र | **१५७५१९.४०** | **४०८७१.७५** | | | | |

## अनुसूची-२

| मौजे-मुलुंड (पूर्व) तालुका-कुर्ला-मुंबई उपनगर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र चौ.मी. | घोषित करावयाचे क्षेत्र चौ.मी. | चतु:सिमा | | | |
| | | | | पुर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
| १ | ४६ | शेती | १७१४.५० | पूर्व द्रुतगती मार्ग व न.भू.क्र. ४६ (पै.) | न.भू.क्र. ४६ (पै.) | न.भू.क्र. ४६ (पै.) | मौजे-नौपाडा, न.भू.क्र. ९८३ |

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ब च्या पोटकलम (३) अनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करुन दिनांक ९ एप्रिल १९९८ रोजी राजपत्रात प्रसिध्द केली आहे,

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ (क) उप-कलम (१) अनुसार "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" घोषित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत,

त्याअर्थी, उक्त कलम ३ (क) चे उपकलम (१) मधील शक्तीचा वापर करुन मी, वरील प्रमाणे अनुसूची-२ मध्ये दर्शविलेले क्षेत्र "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून याद्वारे घोषित करीत आहे. सदरचे क्षेत्र बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ चे नियम ३३ (१०) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन योजना" दाखल करण्यास पात्र आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
प्रशासकीय इमारत, प्रा.अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पुर्व) मुंबई ४०००५१

(दीपक कपूर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण